Nashik Peth Road, Section of NH-848 (7.332 ha)

Additional Information about the project

The following provisions can be considered while grating approval for the proposed project:

1) **Hon'ble Deputy Speaker of Maharashtra Legislative Assembly who is also the MLA of Peth-Dindori** has written to this office that a well equipped Ambulance (along with maintenance) stationed in Peth Taluka should be made available for the victims in conflict with wildlife e.g. Snake Bite, Leopard attack etc.
2) Hon'ble Deputy Speaker of Maharashtra Legislative Assembly who is also the MLA of Peth-Dindori has also written to this office that **a Well equipped Wildlife Rescue Van along with equipments for Rescue Operations** should be made available in the area to provide First Aid and translocation of the animal injured by Road Accident. This may help in reducing incidences of Road Kill.
3) User Agency should provide alternative buildings which are being demolished due to construction of this Greenfield project like **RFO Quarter, Offices and quarter of other Frontline Staffs, Labour Sheds etc**
4) RFO (Peth) and RFO (Nanashi) have raised concerns **regarding increase in illegal smuggling of Timber to Gujarat due to enhanced Vehicular Speed**. Frontline staff has expressed their inability in chasing these fast moving vehicle to Gujarat through the border. Hence **Sports Utility Vehicles** can help in enhancing their capabilities which can reduce the incidences of illegal smuggling.
5) Measures should be taken by the User Agency to prevent Noise and Air Pollution due to Road Construction like **Avenue plantations on the sides.**
6) Construction of this Road will reroute the traffic and there is a need to keep a vigil on vehicles passing through the proposed road to prevent forest offences. A forest guard should be permanently stationed near the highway. **Hence a Check Naka along with Forest Guard Quarter** if constructed near the proposed road may help in reducing Forest Offences.

Dy Conservator of Forests,
West Nashik Division

News Report
Road Accident of Wild Animals
in Nashik Maharashtra

दिव्य मराठी

# शिलापूर परिसरात रस्ता ओलांडताना वाहनाच्या धडकेत बिबट्या जखमी

जखमी बिबट्या परिसरात लपण्याने शेतकऱ्यांमध्ये भीती

प्रतिनिधी | नाशिक



नाशिक-औरंगाबाद महामार्गावर असलेल्या शिलापूरजवळ देवकीनंदन मंगल कार्यालयासमोर बुधवारी रात्री सात-साडेसातच्या सुमारास रस्ता ओलांडताना बिबट्याला अज्ञात वाहनाने धडक दिली. सुदैवाने बिबट्या किरकोळ जखमी झाला. तो परिसरात लपला आहे. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

जिल्ह्यामध्ये बिबट्यांचा वावर वाढत आहे. बुधवारी रात्री साडेसात वाजेच्या सुमारास शिलापूर येथील देवकीनंदन मंगल कार्यालयासमोर पोलिसपाटील कहांडळ यांच्या वस्तीजवळ रस्ता ओलांडत असताना चार ते पाच वर्षांच्या बिबट्याला अज्ञात वाहनाने धडक दिले. त्यात तो जखमी झाला. धडक बसल्यानंतर बिबट्या काहीकाळ रस्त्याच्या बाजूलाच बसून होता. नागरिकांची गर्दी होताच तो परिसरात लपून बसला असल्याची माहिती किरण गोडसे यांनी दिली.

गुरुवार - 3/12/20

---

लोकमत मंगळवार 15/12/2020

# राज्यात ११ महिन्यांत १७३ बिबट्यांचा मृत्यू

## 'रोड किल'चे वनविभागासमोर आव्हान




अझहर शेख
लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** राज्यात गेल्या अकरा महिन्यांत रस्ते अपघात, विहिरीत पडून, तसेच शिकार आदी कारणांमुळे तब्बल १७३ बिबट्यांचा मृत्यू झाला आहेत. त्यात नाशिक व अहमदनगर जिल्ह्याचा भाग असलेल्या नाशिक वनवृत्तात सर्वाधिक ७० बिबट्यांचा बळी गेला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा राज्यात ६३ बिबट्यांचा अधिक मृत्यू झाला आहे.

राज्यात मागील वर्षी ११० बिबटे मृत्युमुखी पडले होते. यामध्ये नाशिक वनवृत्तातील ३९ बिबट्यांचा समावेश होता. हा आकडा राज्यात उच्चांकी होता. या वर्षीही नाशिक वनवृत्तामधील बिबट्यांच्या मृत्यूचे प्रमाण अधिक आहे. गेल्या वर्षीच्या ३९च्या तुलनेत नोव्हेंबरअखेरीस ३१ बिबटे अधिक मृत्युमुखी पडले आहेत. यंदाचे वाढते मृत्यू चिंतेची बाब मानली जात आहे.

### नाशिकपाठोपाठ पुण्याचा क्रमांक

नाशिक वनवृत्तात सुमारे ७० बिबटे यंदा नोव्हेंबरपर्यंत मृत्युमुखी पडल्याची नोंद वनविभागाच्या दप्तरी आहे. त्या पाठोपाठ पुणे जिल्ह्यात आतापर्यंत २६ बिबटे मृत्युमुखी पडले आहेत, तर कोल्हापूरमध्ये २६ आणि धुळ्यात १० बिबटे गतप्राण झाले.

News Report
Road Accident of Wild Animals
in Nashik Maharashtra

लोकमत रविवार 20/12/2020

# अपघातातील जखमी कोल्ह्याला जीवदान

■ लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिक : भरधाव वाहनाच्या धडकेत पेगलवाडी फाट्यावर जखमी झालेल्या अंदाजे दोन वर्षांचा कोल्हाला (मादी) वेळेवर उपचार मिळाल्याने त्याला जीवदान मिळाले.

गुरुवारी (दि.१७) मध्यरात्री बारा वाजेच्या सुमारास पेगलवाडी फाट्याजवळ त्र्यंबकेश्वर रस्त्यावरील पुलावरून जाणाऱ्या कोल्ह्याला एका भरधाव वाहनाने धडक दिली. धडकेत कोल्ह्याच्या जबड्याला जबर मार बसला याबाबतची माहिती नाशिक वनविभागाला मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी विवेक भदाणे, वन्यजीवप्रेमी वैभव भोगले आदींनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. कोल्ह्याची अवस्था बघून तातडीने जागेवरच



उपचार केले आणि उंटवाडी येथील वनविभागाच्या विश्रामगृहात हलविले.

सकाळी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी कोल्ह्याची तपासणी करून औषधोपचार दिले. यानंतर कोल्ह्याला वनखात्याच्या वाहनातून पुण्याच्या बावधान येथील रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्टच्या रिहॅबिटेशन केंद्रात पुढील उपचाराकरिता हलविण्यात आले. तेथे दोन दिवसांपासून उपचार सुरू आहेत. (1)

BOTTOMLINE

Lokmat times 20 Dec.

# Forest department, wildlife lovers save injured fox

**Prompt action during midnight: Further treatment at Pune's rescue center**

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, DEC 20



Accidents are constantly happening in the city and surrounding areas due to reckless driving at night. Wildlife is no exception to accidentds. A two-year-old vixen was injured after getting hit by a speeding vehicle at Pengalwadi Phata. Upon receiving the information, wildlife enthusiasts and the forest department officials rushed to the spot and rescued the injured vixen. Due to the prompt actions of the forest officials, the vixen was saved. There is a sparse and medium forest area along with farms ahead of Satpur on Trimbakeshwar road. Along the road, in Vasali Shivar, Anjaneri Shivar and around the Pengalwadi-Pahine Phata area, wild animals like foxes, leopards and hyenas are found. At night, these wild animals wander around in search of food. On Thursday (December 17) at around midnight, a vixen was hit by a heavy vehicle while crossing the bridge on Trimbakeshwar Road near Pegalwadi Phata. The vixen has sustained injuried in its jaw and its teeth were broken. The injured vixen was lying on the side of the road covered in blood when the forest officals arrived. As soon as the Nashik Forest Department got th information, range fore officer Vivek Bhadan wildlife lover Vaibh Bhogle and others immed ately rushed to the spo Seeing the condition of t vixen, they immediate carried out the firsd aid o the spot and shifted the an mal to the forest depar ment's Untawadi rest hous

## Health condition improved

The next day, veterinary officers examined the vixen and administered medicine. The animal was then shifted from to the Rescue Charitable Trust's rehabilitation center at Bavdhan in Pune for further treatment. It has been undergoing treatment there for the past three days. Sources infomred that the animal's condition has improved a lot. Therefore, it will soon be released into its natural habitat.

पुढारी मंगळवार - 22/12

# बिबट्यांच्या संख्येत ४ वर्षात ६० टक्केवाढ

## केंद्रीय पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर यांची माहि[ती]

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

देशात गेल्या चार वर्षांत बिबट्यांच्या संख्येत ६० टक्के वाढ नोंदविण्यात आल्याची माहिती केंद्रीय पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर यांनी सोमवारी दिली. २०१४ मध्ये बिबट्यांची संख्या जवळपास ८ हजारांच्या घरात होती. परंतु, २०१८ मध्ये या संख्येत वाढ हो[ऊन] ती १२ हजारांपर्यंत पोहोचली, असे जावडेकर म्हणाले. नवी दिल्लीत त्यांच्या हस्ते भारतातील बिबट्यांच्या संख्येच्या स्थितीसंबंधीचा अहवाल प्रकाशित



करण्यात आला.

गेल्या काही वर्षांत वाघ, सिंह तसेच बिबट्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. वन्यजीव तसेच जैवविविधता संवर्धनासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांमुळे हे शक्य झाल्याचे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र, मध्यप्रदेश तसेच कर्नाटकात त्यांची संख्या अधिक असल्याचे मंत्रालयाकडून सांगण्यात आले आहे. व्याघ्र संवर्धनासाठी उचलण्यात आलेल्या महत्त्वाच्या पावलांमुळे पर्यावरणीय साखळीत महत्त्वाची भूमिका असलेल्या बिबट्यासारख्या प्राण्यांचे संरक्षण झाले आहे, असे मत जावडेकर यांनी व्यक्त केले.

### सध्या देशात १२ हजार ८५२ बिबटे

जावडेकर म्हणाले, भारतात सद्यःस्थितीत १२ हजार ८५२ बिबटे आहेत. २०१४ मध्ये ही संख्या ७ हजार ९१० एवढी होती. मध्यप्रदेशात सर्वाधिक ३ हजार ४२१ बिबट्यांची नोंद घेण्यात आली आहे. मध्यप्रदेशपाठोपाठ कर्नाटकात १ हजार ७८३ तसेच महाराष्ट्रात १ हजार ६९० बिबट्यांची नोंद घेण्यात आली. यानिमित्ताने तिन्ही राज्यांकडून करण्यात आलेल्या प्रयत्नांचे जावडेकर यांनी कौतुक केले.

News Report
Increase in Number of Leopard's Population

म. टाइम्स बुधवार 20/1/2021

# अज्ञात वाहनाच्या धडकेत महामार्गावर बिबट्या ठार

**म. टा. वृत्तसेवा,** निफाड

ओझर शहरालगत मुंबई-आग्रा महामार्गावर एचएएलच्या गेटसमोर अज्ञान वाहनाच्या धडकेने बिबट्याचा मृत्यू झाला. सोमवारी (दि १८) रात्री आठ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. ओझर येथील एचएएल कंपनीमधील सबस्टेशन १३२केव्ही मधून येऊन महामार्ग ओलांडत असताना बिबट्याला अज्ञात वाहनाने बिबट्याच्या तोंडाला जबर धडक दिल्याने तो जागीच ठार झाला. मादी असलेल्या या बिबट्याचे वय अवघे एक वर्ष आहे. चांदवड वन विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी संजय पवार यांनी घटनेचा पंचनामा करून मृत बिबट्याचे शव उत्तरीय तपासणीसाठी चांदवड वनपरिक्षेत्र कार्यालयाकडे पाठविले. (2)



News Report
Road Accident of Wild Animals in Nashik Maharashtra